

पाच वर्षे प्रगतीची...
नांदी नव्या युगाची...
श्री.विश्वनाथ चंद्रभागा आत्माराम भोईर
आमदार, कल्याण पश्चिम
शिवसेना

# मनोगत...

**नमस्कार नागरिकहो...**

**सस्नेह जय महाराष्ट्र !**

"या कार्य अहवालाच्या माध्यमातून आपल्याशी संवाद साधताना अतिशय आनंद होत आहे. पाच वर्षांपूर्वी आपण सर्वांनी माझ्यावर विश्वास ठेवून मला भरघोस मतांनी विजयी केले आणि आमदारकीच्या माध्यमातून आपली सेवा करण्याची संधी दिलीत. तुम्ही दाखवलेला विश्वास, प्रेम आणि सहकार्याच्या बळावर या आमदारकीच्या कार्यकाळात शहराची, इथल्या नागरिकांची गरज ओळखून प्रामाणिकपणे काम केले आहे. ही सर्व कामं आपल्या सर्वांच्या नजरेसमोर आहेतच आणि या अहवालातूनही पुन्हा एकदा आपल्या सर्वांसमोर मांडण्याचा प्रयत्न करत आहे.

गेल्या पाच वर्षांच्या कार्यकाळात पहिली दोन ते अडीच वर्षे तर कोवीडमध्येच निघून गेली. मात्र, त्या काळातही आपण कोणताही गाजावाजा किंवा प्रसिध्दी न करता मतदारसंघातील नागरिकांसाठी आवश्यक ती कार्यवाही करत होतो. कोवीडसारखी परिस्थिती असताना देखील 2019 च्या वचननाम्यातील आश्वासना नुसार तब्बल 90 टक्के कामे पूर्ण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न मी केला आहे..

परंतू, कोवीडचे संकट दूर झाल्यानंतर राज्याचे धडाकेबाज मुख्यमंत्री श्री. एकनाथजी शिंदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली व खासदार डॉ. श्रीकांतजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण पश्चिमेत विकासाची गंगा अवतरली. यापूर्वी कधीही मिळाला नव्हता इतका भरघोस निधी मा. शिंदे साहेबांनी कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघासाठी मंजूर केला आणि त्यानंतर कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघांत अक्षरशः विकासकामांचा धडाका लागला आहे. सिमेंट काँक्रीटचे रस्ते असो, रिंग रोड असो, उड्डाणपूल असो, उद्याने असो की स्मार्ट सिटीसह आणखी इतर महत्त्वाची विकासकामे. एकीकडे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या नगरसेवक पदाचा कार्यकाळ संपला असल्याचे लक्षात घेऊन आपण कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक प्रभागामध्ये विकासकामांसाठी निधी देऊन नगरसेवकांची उणीव भरुन काढण्याचाही प्रयत्न केला.

मला याची चांगलीच कल्पना आहे की, कल्याण शहराची वाढ आणि गरज लक्षात घेता आपल्याला मोठ्या जोमाने काम करायचे आहे. ऐतिहासिक आणि सांस्कृतिक ओळख असलेले जुने कल्याण शहर आज कॉस्मोपॉलीटीन बनले आहे. या एकाच ठिकाणी एकीकडे ग्रामीण भाग आणि दुसरीकडे कॉस्मोपॉलीटीन शहर असे चित्र असून या दोन्ही भागांची गरज ओळखून आपण काम करत आहोत आणि यापुढेही आपल्याला अजून भरपूर विकासकामं करायची आहेत.

त्यासाठी येत्या निवडणुकीतही आपण माझ्यावर असाच विश्वास दाखवाल आणि उर्वरित कामे पुर्ण करण्याची आणखी एक संधी द्याल, असा विश्वास आहे."

आपलाच

**विश्वनाथ चंद्रभागा आत्माराम भोईर**

आमदार, कल्याण पश्चिम



शिवसेना



# उड्डाणपुलांची निर्मिती

कल्याण पश्चिम हे एका बेटा प्रमाणे आहे , कारण कल्याण पश्चिम चार बाजु पैकी तीन बाजु ह्या पाण्याने वेढलेल्या आहे व एका बाजूने रेल्वे स्टेशन आहे . ह्या बाबींचा विचार करून कल्याण पश्चिम मतदार संघाला उड्डाण पुलांची किती गरज व महत्व आहे,याचा विचार करता मतदार संघातील दुर्गाडी उड्डाण पूल , पत्रीपूल , मांडा-टिटवाळा उड्डाण पूल , वडवली पूल व प्रस्तावित असणारा उन्नतमार्ग या साठी सतत राज्य शासनाकडे पाठपुरवठा करून ते काम पूर्ण करून घेतले .

आपल्या कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघाची भौगोलिक परिस्थिती पाहता शहरात प्रवेश करण्यासाठी चारही दिशेने उड्डाणपूल आहेत. मात्र, वाढती लोकसंख्या आणि वाहनसंख्येचा विचार करता हे उड्डाणपूल अपुरे पडत असल्याने त्याच शेजारी नवीन प्रशस्त उड्डाणपूल असावेत यासाठी मागील पाच वर्षात आपण पाठपुरावा केला आणि वचननाम्यात दिलेल्या आश्वासनानुसार खासदार श्रीकांत शिंदे साहेब व राज्य सरकार यांच्याकडे पाठपुरावा करुन नवीन पत्रीपुल, नवीन दुर्गाडी पुल आणि शहाडकडून येण्यासाठी वालधुनी नदीवर नविन उड्डाणपूल बांधण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही केली.

## वडवली रेल्वे फाटक पुल

वचननाम्यामध्ये सांगितल्याप्रमाणे गेल्या दशकभरा पासून प्रलंबित राहिलेल्या वडवली रेल्वे फाटक उड्डाणपूलाचा प्रश्न कायमचा सोडवण्यासाठी आपण विशेष प्रयत्न केले. आमदार या नात्याने शासनाकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा करुन या वडवली रेल्वे फाटक उड्डाणपूलासाठी आवश्यक तो सर्व निधी उपलब्ध करून घेतला. यानंतर कोविडच्या काळात हा उड्डाणपूल पुर्णत्वास येऊन नागरिकांच्या सेवेत रुजू झाला. या उड्डाणपूलामुळे लोकल आणि एक्स्प्रेसचा खोळंबाही दूर झाला आणि विशेष म्हणजे नागरिकांचा त्रास वाचला..





विश्वासातला माणूस

पाच वर्षे प्रगतीची... नांदी नव्या युगाची...

## टिटवाळा रेल्वे फाटक पुल

टिटवाळा पूर्व आणि पश्चिमेला जोडणारा रेल्वे मार्गावरील महत्त्वाचा उड्डाणपूलही आपण पाठपुरावा करून शासनाकडून मंजूर करून घेतला. दरम्यान आता याचे काम पुर्ण झाले असून हा नागरिकांच्या सेवेत दाखल झाला आहे. हा पूल पूर्ण झाल्याने हजारो नागरिकांना दिलासा मिळाला आहे.





## पत्री पूल

कल्याण पश्चिम आणि कल्याण पूर्वेसाठी जोडणारा वाहतुकीचा, दळणळणाचा महत्त्वाचा दुवा असणारा इंग्रज कालीन जर्जर झालेला पत्री पुल तोडून त्याठिकाणी नवीन पत्रीपुल "आई तिसाईदेवी उड्डाणपुल" नावाने उभारुन तो सर्वांसाठी वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे.

## दुर्गाडी पुल

कल्याणमार्गे भिवंडी व त्यापुढे नाशिक, ठाणे, मुंबई येथे जाण्यासाठी अत्यंत महत्वाचा असलेला दुर्गाडी खाडीवर प्रशस्त अशा सहा पदरी उड्डाणपुलासाठी सातत्याने पाठपुरावा करुन तो पुल वाहतुकीसाठी खुला करण्यात आला.







# महत्वकांक्षी रिंग रोड प्रकल्प

स्वतः भूमिपुत्र असल्यामुळे स्थानिक भूमिपुत्रांच्या भूसंपादना संदर्भातील समस्या अथवा अडचणी जाणून घेत शासन व भूमीपुत्र यांच्यातील दुवा बनून योग्य तो सुवर्ण मध्य साधला व रिंग रोड प्रकल्पाचे काम जवळ जवळ पूर्ण केले. हा रिंगरोड दुर्गाडी ते टिटवाळा येथून जात असून आपल्या मतदारसंघातील नागरिकांना याचा मोठ्या प्रमाणावर फायदा होणार आहे.

## प्रकल्पाचा फायदा ?

- शहराची वाहतूक कोंडीतून मुक्तता
- नागरिकांचा वेळ व इंधनाची बचत होणार
- प्रवास गतिमान होणार
- प्रदूषण कमी होणार व आरोग्य सुधारणार

कल्याण आणि डोंबिवलीतील वाहतूक कोंडी फोडण्याच्या दृष्टीने अत्यावश्यक आणि अतिमहत्त्वाचा असलेल्या महत्त्वाकांक्षी रिंग रोड प्रकल्पाचे कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघातील जवळपास 90 टक्के काम पूर्ण झाले आहे. कल्याण लोकसभेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे साहेब हे या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी पाठपुरावा करत आहेत. या प्रकल्पासाठी तब्बल 2,186 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.


तर कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघातील टप्पा 4 (दुर्गाडी ब्रिज ते गांधारे ब्रिज), टप्पा - 5 (गांधारी ब्रिज ते मांडा जंक्शन), टप्पा 6 (मांडा जंक्शन ते टिटवाळा जंक्शन), टप्पा - 7 (टिटवाळा जंक्शन ते एसएच 35-40 रोड जंक्शन) या टप्प्यांचे काम 95 टक्के पूर्ण झाले असून उर्वरित काम प्रगतीपथावर आहे. त्यासाठी आवश्यक असलेले भूसंपादन आणि इतर स्थानिक नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी आपण पुढाकार घेतला आहे. या प्रकल्पामुळे कल्याण, डोंबिवली, शहाड, आंबिवली आणि टिटवाळा शहरातील वाहतुकीला नवा पर्याय उपलब्ध होणार आहे.





# मतदारसंघातील रस्त्यांचे जाळे

मी आमदार होण्याआधी कल्याण पश्चिममधील रस्त्याचा प्रश्न गंभीर बनला होता. महापालिकेचे हजारो कोटी रुपये रस्त्यांचे डांबरीकरण व खड्डे बुजवण्यात खर्च होत होते. त्यामुळे या प्रश्नावर प्राधान्याने काम करत शहरातील मुख्य रस्ते व अंतर्गत रस्ते (गटारे व ड्रेनेजसहित) यांवर लक्ष केंद्रित करून संबंधित रस्ते हे काँक्रिटचे बनवले. हे सर्व रस्ते कॉंक्रिटचे केल्यामुळे पुढील किमान 15 ते 20 वर्ष या रस्त्यांवरील खड्ड्यांचा प्रश्न उद्भवणार नाही. जेणेकरुन महापालिकेचा व करदात्या नागरिकांचा कोट्यावधी रुपयांचा निधी वाचेल. दरम्यान येणाऱ्या काळामध्ये उर्वरित रस्त्यांची कामे पुर्ण करण्याचा मानस असून हि कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी कटीबद्ध आहे.










विश्वासातला माणूस

पाच वर्षे प्रगतीची... नांदी नव्या युगाची...



# पायाभूत सुविधा

## नविन सिमेंट काँक्रीटचे रस्ते



आपल्या कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघातील सर्व रस्ते सिमेंट काँक्रीटचे बनवण्यात येतील असे आश्वासन आपण आपल्या वचननाम्यात दिले होते. त्यानूसार आपण सुरुवात करत मतदार संघातील प्रमूख रस्त्यांपासून ते अंतर्गत रस्त्यांपर्यंत सर्व रस्ते खड्डेमुक्त होण्यासाठी सिमेंट काँक्रीटचे करण्याची कार्यवाही सुरु केली आहे.

पहिल्या टप्प्यात अनेक लहान मोठे रस्ते हे सिमेंट काँक्रीटचे बनवण्यात आले असून आगामी काळात देखील मतदारसंघातील सर्व रस्ते सिमेंट काँक्रीटचे केले जाणार आहेत. यामुळे मतदारसंघातील नागरिकांना साईस्कर व आरामदायी प्रवास करता येईल.

## आरोग्य सुविधा

आरोग्याला प्राधान्य देत राज्याचे धडाकेबाज मुख्यमंत्री श्री. एकनाथजी शिंदे साहेब यांच्या संकल्पनेतून साकार झालेला **'वंदनीय बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना'** हा आपल्या कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघात सुरु केला गेला. या आपल्या दवाखान्यामध्ये संपूर्णपणे मोफत उपचार आणि आरोग्य चाचण्या केल्या जात असून आतापर्यंत हजारो नागरिकांनी त्याचा लाभ घेतला आहे आणि आजही घेत आहेत. याशिवाय अनेक गंभीर आजारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांना उत्तम उपचार मिळावेत यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी मिळवून दिला आहे. यामुळे अनेक रुग्णांना आरोग्याच्या समस्यांपासून मुक्ती मिळाली आहे.










पाच वर्षे प्रगतीची...
नांदी नव्या युगाची...

## मतदारसंघात नविन जलवाहिन्यांसाठी निधी केला उपलब्ध



पाणी हे मुलभूत गरजेपैकी एक गरज. मात्र, या पाण्यामुळे कुणाला त्रास होऊ नये म्हणून कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघाच्या शहरी आणि ग्रामीण भागातील जलवाहिन्यांवर लक्ष केंद्रीत करत मतदार संघातील जलवाहिन्यांसाठी भरीव निधी उपलब्ध करून दिला आहे. तसेच मतदारसंघातील जुन्या झालेल्या जलवाहिन्या बदलून मतदारसंघात पाणी पुरवठा सुरळीत व्हावा यासाठी विशेष लक्ष घालून तातडीने नविन जल वाहिन्या टाकण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला. यामुळे हजारो नागरिकांना मोठा दिलासा मिळाला. आगामी काळात हा पाणी प्रश्न कायमचा मिटावा व पाण्या संदर्भातील सर्व समस्या संपुष्टात याव्यात यासाठी देखील मोठ्या प्रमाणात उपाय योजना आखल्या जात आहेत.

## घरोघरी पाईप लाईनद्वारे गॅस जोडणीसाठी पुढाकार

मतदार संघातील नागरिकांना घरोघरी येणाऱ्या सिलेंडरपासून मुक्ती मिळावी आणि थेट पाईपलाईनच्या माध्यमातून गॅस आपल्या घरापर्यंत पोहोचावा, यासाठी पाईपलाईन द्वारे थेट गॅस जोडणी या कामाला मतदारसंघामध्ये प्राधान्य दिले. पाईपलाईनच्या माध्यमातून गॅस जोडणी मतदारसंघात विविध इमारतीमध्ये करून घेतली.

आगामी काळामध्ये संपूर्ण मतदारसंघात पाईपलाईन द्वारे गॅस सर्वांच्या घरापर्यंत पोहोचणार आहे. यामुळे गॅस गळती, गॅस चोरी यांसारख्या समस्यांपासून नागरिकांना मुक्ती मिळणार आहेत.

















## शासन आपल्या दारी

मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्या नेतृत्त्वात राज्यशासनाच्या शासन आपल्या दारी या उपक्रमा अंतर्गत राज्य शासनाच्या अनेक योजनांचा लाभ मतदारसंघातील सर्वसामान्य जनतेला मिळवून दिला. या उपक्रमाच्या माध्यमातून शासनाच्या निर्धारित २०० हून अधिक योजनांचा लाभ नागरिकांना एकच ठिकाणी मिळाला. या उपक्रमा अंतर्गत राज्यशासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांनी माहिती उपस्थित सर्व नागरिकांना देण्यात आली.

## महिला सक्षमीकरण

आपल्या मतदारसंघातील महिलांना त्यांच्या पायावर उभे करण्यासाठी आणि त्यांना सक्षम बनवण्यासाठी महिला बचत गटामार्फत शेकडो महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली आहे. या बचत गटाच्या माध्यमातून या महिला अनेक लहानमोठे व्यवसाय करत आज खंबीरपणे आपल्या कुटुंबाचा आधारस्तंभ बनल्या आहेत. महिला बचत गटासोबतच विविध महिला मंडळ स्थापन करुन अनेकविध सांस्कृतिक कार्यक्रम राबवण्यात आले आहेत. आपल्या या भगिनींच्या या कार्यकर्तुत्वाला मनापासून सलाम!














## मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना

मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्या नेतृत्त्वात राज्य सरकारने राबवलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना ही महिला सक्षमीकरणासाठी महत्त्वपूर्ण योजना ठरत आहे. दरमहा महिला भगिणींच्या खात्यामध्ये १५०० रूपये जमा होत असल्यामुळे महिला भगिणींमध्ये दिलासादायक चित्र पाहायला मिळत आहे. कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघातील जास्तीत जास्त महिलांना राज्य सरकारच्या या योजनेचा लाभ मिळावा यासाठी ठिकठिकाणी योजनेचे अर्ज भरून घेत हजारो महिला भगिणींना या योजनेचा लाभ मिळवून दिला.






## रक्षाबंधनानिमित्त लाडक्या बहिणींसाठी विशेष कार्यक्रम

रक्षाबंधनानिमित्त लाडक्या बहिणींसाठी विशेष कार्यक्रम आयोजित करत या महिला भगिणींचा सन्मान केला. मतदारसंघातील महिला, भगिणींना व त्यांच्या कुटुंबियांना या योजनेचा लाभ योग्यरित्या मिळतोय का हे पाहण्यासाठी कुटुंब भेट अभियानाच्या माध्यमातून या महिला भगिणींना व त्यांच्या कुटुंबियांना भेटून त्यांच्याशी संवाद साधला. तसंच लाडकी बहिण संपर्क अभियानाच्या माध्यमातून या लाभार्थी बहिणींना या योजनेचा फायदा सांगितला.







# कल्याण पश्चिममध्ये सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल

कल्याण पश्चिममध्ये सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल व्हावे या मागणीला आपल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याने यश मिळाले असून या हॉस्पिटलसाठी मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब आणि खासदार डॉ. श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या सुचनेनुसार पालिकेने गौरीपाडा परिसरात हॉस्पिटलसाठी आरक्षित भूखंडावर तळ अधिक तीन मजली इमारत उपलब्ध करून दिली आहे.

या ठिकाणी १०० बेडचे सुसज्ज असे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल उभ राहणार आहे.











विश्वासातला माणूस

पाच वर्षे प्रगतीची... नांदी नव्या युगाची...



# स्वतंत्र धरणासाठी पाठपुरावा

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील लोकसंख्येने आज 20 लाखांचा टप्पा ओलांडला आहे. इतक्या मोठ्या लोकसंख्येला पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे ही लोकप्रतिनिधी म्हणून आपली सर्वात महत्त्वाची जबाबदारी आहे. ही जबाबदारी ओळखूनच आपण गेल्या तीन वर्षांपासून कल्याण डोंबिवलीला पाणी पुरवठा करण्यासाठी स्वतंत्र धरण मिळावे यासाठी शासन दरबारी पाठपुरावा करत आहोत.

राज्याच्या अधिवेशनातही आपण हा मुद्दा लावून धरला असून राज्याचे धडाकेबाज मुख्यमंत्री श्री एकनाथजी शिंदे साहेब यांनी आपली ही मागणी तत्वतः मान्य केली आहे. तसेच त्यादृष्टीने जिल्हा प्रशासन, जलसंपदा विभागासह इतर संबंधित अधिकाऱ्यांना कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार आपल्या पुढाकाराने काही महिन्यांपूर्वी ठाणे जिल्हाधिकारी यांच्या नेतृत्वाखाली केडीएमसी आयुक्त आणि जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठकही संपन्न झाली आहे. त्यामूळे येत्या काळात कल्याण डोंबिवलीकरांना लवकरच स्वतंत्र धरणातून पाणी पुरवठा होईल हा आपल्याला ठाम विश्वास आहे.

## मण्याचा पाडा येथे तब्बल 60 वर्षांनी आली लाईट






कल्याणसारख्या शहरी भागाच्या जवळ असूनही गेल्या कित्येक दशकांपासून मण्याचा पाडा या आदिवासी वस्तीमध्ये स्ट्रीट लाईटची सुविधा पोहचू शकली नव्हती. ज्यामुळे संध्याकाळी अंधार पडल्यानंतर हे गाव निर्मनुष्य होऊन जायचे. आपल्या निदर्शनास ही समस्या आल्यानंतर वेळ न दवडता इथल्या भागातील स्ट्रीट लाईटसाठी पालिकेकडे पाठपुरावा करून आवश्यक तो निधी उपलब्ध करून दिला. तसंच या स्ट्रीट लाईट केडीएमसीकडून लावून घेत सुरु करून घेतले. हे स्ट्रीट लाईट सुरु होताच इथल्या ग्रामस्थांनी फटाके फोडून अक्षरशः दिवाळीप्रमाणे आनंद साजरा केला. तर लहान मुलांचा आनंद तर गगनात मावत नव्हता. त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून आपण खऱ्या अर्थाने भरून पावलो.

# महसुल इमारत बांधणीसाठी विशेष पाठपुरावा करून उपलब्ध केला निधी

## कल्याणमध्ये उभे राहणार भव्य महसूल भवन!

- कल्याण पश्चिममधील शासकीय महसूल भवन इमारत बांधण्यासाठी राज्य सरकारकडे पाठपुरावा करून उपलब्ध केला निधी
- महसूल भवनासाठी तब्बल 14 कोटी 89 लाख रुपयांची तरतूद
- याच भावनामध्ये तयार होणार तहसील कार्यालय व त्या अनुषंगिक कार्यालये तसेच कोषागार कार्यालय
- याचसोबत कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघामध्ये अद्ययावत अशी 16 तलाठी कार्यालये विविध परिसरात उभारली जाणार आहेत. या कार्यालयांसाठीही शासनस्तरावर आवश्यक तो पाठपुरावा करून 2 कोटी 40 लाख रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात करून घेतली आहे. तसेच या निधीला प्रशासकीय मान्यताही प्राप्त झाली असल्याने या नव्या तलाठी कार्यालयांचे काम लवकरच सुरु होईल.



विश्वनाथ आत्माराम भोईर
आमदार
१३८, कल्याण पश्चिम विधानसभा

महाराष्ट्र विधानसभा

सत्यमेव जयते

कार्यालय : श्री कॉम्प्लेक्स, फेज-२, शॉप नं. २, कै. आत्माराम भोईर चौक, कोळवली रोड, उंबर्डे, कल्याण (प.)
भ्रमणध्वनी : ९८१९६२३१६०, ई-मेल : vishwanathbhoir1970@gmail.com

व्ही.अे.बी./एम.एल.ए./३५८/२०२२

दि.०२ऑगस्ट,२०२२

प्रति,
मा.ना.श्री.एकनाथजी शिंदे साहेब,
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य,
मंत्रालय, मुंबई -३२

विषय:-कल्याण जि.ठाणे येथे प्रशासकीय इमारत मंजूर करणेबाबत..!

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कल्याण जि.ठाणे येथील तहसील कार्यालय,पंचायत समिती कार्यालय, शिधावाटप कार्यालय,तालुका कृषी अधिकारी कार्यालय, दुय्यम निबंधक कार्यालय,भूमिअभिलेख कार्यालय तसेच पोलीस विभागाचे कार्यालय अतिशय अपुऱ्या स्वामी सुविधांचा अभाव असणाऱ्या इमारतीमध्ये आहेत तसेच बहुतांश शासकीय कार्यालय हे भाड्याच्या इमारतीमध्ये आहेत. कल्याण शहराचा विस्तार मोठ्या प्रमाणात होत असून ही सर्व कार्यालये शहरातील विविध भागात असल्याने नागरिकांची व अभ्यागतांची शासकीय कामाकरता पायपीट होते. तालुका मुख्यालय असलेले सर्व शासकीय कार्यालय एकाच छताखाली असावे असे शासनाचे धोरण असल्याने तालुका मुख्यालय कल्याण येथे सर्व सुविधायुक्त नवीन प्रशासकीय ईमारत असावी अशी सततची मागणी देखील आहे.


करिता तालुका मुख्यालय असलेल्या कल्याण जि ठाणे येथे नवीन प्रशासकीय इमारत मंजूर करून त्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्यात यावी, ही विनंती.

महाराष्ट्र विधान मंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई

आपला स्नेहांकित

(विश्वनाथ भोईर)
आमदार कल्याण (प.)

निवास : "मातोश्री", कोळीवली रोड, उंबर्डे, कल्याण (प.) ४२१ ३०१.



विश्वनाथ आत्माराम भोईर
आमदार
१३८, कल्याण पश्चिम विधानसभा

महाराष्ट्र विधानसभा

सत्यमेव जयते

कार्यालय : श्री कॉम्प्लेक्स, फेज-२, शॉप नं. २, कै. आत्माराम भोईर चौक, कोळवली रोड, उंबर्डे, कल्याण (प.)
भ्रमणध्वनी : ९८१९६२३१६०, ई-मेल : vishwanathbhoir1970@gmail.com

व्हा.अ.बा./एम.एल.ए./३०० /२०२२

दि.११ जुलै,२०२२

प्रति,
मा.ना.श्री.एकनाथजी शिंदे साहेब,
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य,
मंत्रालय, मुंबई -३२

विषय:-कल्याण जि.ठाणे येथे प्रशासकीय इमारत मंजूर करणेबाबत..!

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कल्याण जि.ठाणे येथील तहसील कार्यालय,पंचायत समिती कार्यालय, शिधावाटप कार्यालय,तालुका कृषी अधिकारी कार्यालय, दुय्यम निबंधक कार्यालय,भूमिअभिलेख कार्यालय तसेच पोलीस विभागाचे कार्यालय अतिशय अपुऱ्या स्वामी सुविधांचा अभाव असणाऱ्या इमारतीमध्ये आहेत तसेच बहुतांश शासकीय कार्यालय हे भाड्याच्या इमारतीमध्ये आहेत. कल्याण शहराचा विस्तार मोठ्या प्रमाणात होत असून ही सर्व कार्यालये शहरातील विविध भागात असल्याने नागरिकांची व अभ्यागतांची शासकीय कामाकरता पायपीट होते. तालुका मुख्यालय असलेले सर्व शासकीय कार्यालय एकाच छताखाली असावे असे शासनाचे धोरण असल्याने तालुका मुख्यालय कल्याण येथे सर्व सुविधायुक्त नवीन प्रशासकीय ईमारत असावी अशी सततची मागणी देखील आहे.

करिता तालुका मुख्यालय असलेल्या कल्याण जि ठाणे येथे नवीन प्रशासकीय इमारत मंजूर करून त्यासाठी आवश्यक रु.२०.०० कोटी निधीची तरतूद करण्यात यावी, ही विनंती.

महाराष्ट्र विधान मंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई

आपला स्नेहांकित

(विश्वनाथ भोईर)
आमदार कल्याण (प.)

निवास : "मातोश्री", कोळीवली रोड, उंबर्डे, कल्याण (प.) ४२१ ३०१.






पाच वर्षे प्रगतीची...
नांदी नव्या युगाची...



# विधीमंडळातील भाषणे आणि उपस्थित केलेले मुद्दे

केवळ आणि केवळ कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघाचा विकास डोळ्यांसमोर ठेवून राज्याच्या प्रत्येक अधिवेशनामध्ये आपण वेगवेगळे मुद्दे आणि प्रश्न उपस्थित करत राज्य शासनाचे त्याकडे लक्ष वेधले. ज्यामध्ये खालील प्रश्न आणि मुद्दे उपस्थित केले.

1. महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या किल्ले दुर्गाडीची पुनर्रचना, पुनर्बांधणी आणि नुतनीकरण करून ते पर्यटन स्थळ म्हणून विकसित करणे.

   अधिक माहितीसाठी स्कॅन करा.

2. कल्याण डोंबिवलीसाठी स्वतंत्र धरण आरक्षित करणे.

   अधिक माहितीसाठी स्कॅन करा.

3. आगरी-कोळी भवन आणि वारकरी भवन बांधणे.

   अधिक माहितीसाठी स्कॅन करा.

4. आगरी कोळी समाजासाठी आर्थिक विकास महामंडळ स्थापन करणे.

   अधिक माहितीसाठी स्कॅन करा.

5. मतदारसंघांतील खेळाडूंसाठी क्रिडांगण बनवणे.

   अधिक माहितीसाठी स्कॅन करा.

विश्वासातला माणूस

पाच वर्षे प्रगतीची... नांदी नव्या युगाची...

6 उंबर्डे कचरा प्रकल्पातील भोंगळ कारभार.

अधिक माहितीसाठी स्कॅन करा.

7 भूमिपुत्रांच्या गावठाण जमिनीचा मुद्दा.

अधिक माहितीसाठी स्कॅन करा.

8 जुन्या झालेल्या पोलीस ठाण्याच्या कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत बांधणे.

9 कल्याणमधील बाई रुक्मिणीबाई रुग्णालय आणि डोंबिवलीतील शास्त्रीनगर रुग्णालय हे शासनाने ताब्यात घेणे. या दोन्ही ठिकाणी मुंबईच्या धर्तीवर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल उभारणे.

10 सर्व शासकीय कार्यालये एकाच ठिकाणी असलेली अद्ययावत अशी प्रशासकीय इमारत मंजूर करणे.

11 वालधुनी नदीचे संवर्धन करणे.

12 कापूरबावडी ते कल्याण मेट्रोचा विस्तार श्री क्षेत्र टिटवाळा येथील महागणपती मंदिरापर्यंत करणे.

13 25 हजार लोकवस्तीच्या सापर्डे गावातील रस्ता बनवणे.

14 पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी नविन पोलीस वसाहत मंजूर करणे.

15 टिटवाळा येथील श्री महागणपती मंदिर परिसराचा विकास करणे आणि त्याला पर्यटनस्थळाचा दर्जा प्राप्त करुन देणे.

**असे अनेक महत्त्वाचे प्रश्न मांडून त्याकडे शासनाचे लक्ष वेधले व हे प्रश्न पुर्णत्वास नेण्यासाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा केला.**




पाच वर्षे प्रगतीची...
नांदी नव्या युगाची...

# 2019 च्या विधानसभा निवडणूकीत प्रसिद्ध केलेला जाहिरनामा....

## रस्ते व वाहतूक

- कल्याण स्टेशन परिसर वाहतुक कोंडी मुक्त करण्याकरिता स्मार्ट सिटी योजने अंतर्गत मंजुर झालेला प्रकल्प पूर्णत्वास नेणार.
- शहराच्या सर्वांगीण विकासासाठी मांडा टिटवाळा-कल्याण-मोठागाव (डोंबिवली) असा रिंग रूट प्रकल्प पूर्णत्वास नेणार.
- कल्याण शहरातील मुरबाड रोड येथील वाहतूक समस्या सोडविण्याकरिता भवानी चौक ते विठ्ठलवाडी स्मशान भूमी असा उड्डाणपूल बांधणार.
- फेब्रुवारी २०२० पर्यंत पत्रीपुल नागरिकांसाठी खुला करणार. तसेच एम.एस.आर.डी.सी. मार्फत आणखी एक पत्रीपुल (ए.पी.एम.सी. कचोरे-एम.आय.डी. सी. रोड) बांधणार.
- दुर्गाडी चौक ते कोनगाव सुरु असलेल्या उड्डाणपुलाचे काम पाठपुरावा करून लवकरच नागरिकांकरिता खुला करणार.
- उल्हास नदीवरील शहाड-वडवली जोडणारा नवीन पुल विकसीत करणार.
- मांडा-टिटवाळा रेल्वे क्रॉसिंग बंद करून, तेथे उड्डाणपुल (R.O.B) बांधणार.
- २०२० मध्ये वडवली उड्डाणपुल नागरिकांसाठी खुला करणार.
- कल्याण शहरात ठिकठिकाणी सिग्नल यंत्रणा सुरु करणार.
- केंद्र शासन व महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने मंजुर झालेला जल वाहतुक प्रकल्प मार्गी लावणार.
- शहर खड्डे मुक्त करण्याकरिता सर्व मुख्य व अंतर्गत रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करणार.
- राज्य शासन मार्फत मंजूर कल्याण-भिवंडी-ठाणे मेट्रो प्रकल्पाची लवकरात लवकर पूर्तता करणार.
- वडवली फाटक, मोहने गावठाण ते जेतवननगर येथे ६० फूटी रस्ता बनविणार.
- क.डों.म.पा. परिवहन सेवा बळकट करण्याकरिता स्मार्ट सिटी अंतर्गत "इंटीग्रेटेड ट्रांझिट मॅनेजमेंट" प्रकल्प राबविणार.

## मैदाने, उद्याने, क्रीडांगणे, मनोरंजन केंद्रे

- कल्याण मध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे मनोरंजन केंद्र उभारण्याच्या उद्देशाने "सिटी पार्क" प्रकल्प लवकरात लवकर पूर्णत्वास नेणार.
- कल्याण शहरात आंतरराष्ट्रीय दर्जाचे शुटींग रेंज बनविणार.
- ठिकठिकाणी खेळाची मैदाने विकसीत करणार. तसेच सद्यपरिस्थितीत असलेल्या मैदानांमध्ये अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देणार.
- ठिकठिकाणी नवीन उद्याने विकसीत करणार. तसेच अस्तित्वात असलेल्या उद्यानांना कायमस्वरुपी सुस्थितीत ठेवण्याची व्यवस्था करणार.
- टिटवाळा शहर पर्यटन स्थळ म्हणून विकसीत करणार.




पाच वर्षे प्रगतीची...
नांदी नव्या युगाची...

## शैक्षणिक

- टिटवाळा येथे विद्यार्थ्यांसाठी मेडिकल कॉलेज उभारणार.
- मुंबई विद्यापीठाच्या उपकेंद्राचे विस्तारीकरण करणार.
- शहरात ठिकठिकाणी विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका सुरु करणार.
- युवकांसाठी नित्य नियमाने करिअर, रोजगार विषयक मार्गदर्शन मेळावे आयोजित करणार.
- महापालिका शाळांचा दर्जा वाढविण्यासाठी प्रयत्नशील राहणार.
- युवकांसाठी शहरातच रोजगार निर्मितीसाठी प्रयत्न करणार.

## पाणी पुरवठा योजना

- वाढत्या लोकसंख्येसाठी पाण्याचे प्रभावी नियोजन करणार.
- जुन्या जलवाहिन्या बदलून, नविन जलवाहिन्या टाकणार.
- पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी महापालिकाद्वारे वॉटर ऑडिट करणार.
- वाढत्या लोकसंख्येसाठी आवश्यकतेनुसार जलकुंभ उभारणार.
- मतदारसंघात सर्व ठिकाणी रेन वॉटर हार्वेस्टींग प्रभावी पणे राबविणार.

## ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक

- महिला बचत गटांच्या सक्षमीकरणासाठी प्रभावी योजना राबविणार.
- ज्येष्ठ नागरिकांकरिता ज्येष्ठ नागरिक कट्टे, आजी-आजोबा पार्कची संख्या वाढविणार.
- ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या व शासनाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी व्यासपीठ तयार करणार.
- स्थानिक पातळीवरच युवक व महिलांना रोजगार मेळावा यासाठी विशेष योजना राबविणार.
- युवकांसाठी अद्ययावत व्यायामशाळांची (जिम) संख्या वाढविणार.
- वार्षिक युवा महोत्सव व महिला महोत्सवाचे आयोजन करुन, त्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करुन देणार.

## स्मार्ट सिटी प्रकल्प

- नागरिकांना उत्तम नागरी सेवा देण्याकरिता व शासन, प्रशासनाशी सांगड करीण्याकरीता स्मार्ट गर्व्हनन्स प्रकल्प राबविणार.
- नागरिकांच्या सुरक्षतेच्या दृष्टीने स्मार्ट एलिमेंटस् प्रकल्पा अंतर्गत ठिकठिकाणी सी. सी. टी. व्ही कॅमेरे बसविणार. तसेच आपात्कालीन व्यवस्थेकरिता इंटिग्रेटेड कमांड कंट्रोल सेंटरची स्थापना करणार.
- आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शहराची वाहतूक कोंडी फोडण्यासाठी स्मार्ट पार्किंग प्रकल्प राबविणार.
- संपूर्ण शहरात एलईडी स्ट्रीट लाईट बसविणार.
- शहरातील प्रत्येक चौक वाहतूकीच्या दृष्टीने डिझाइन करणार.
- शहरात सर्व शासकीय इमारतींवर सौर उर्जा वापरुन विजेची बचत करणार.
- कल्याणचा साधारण ०२ कि. मी. खाडीकिनारा विकसीत करुन तेथे चौपाटी तयार करणार.
- शहरातील विविध तलावांचे काळा तलावाच्या धर्तीवर सुशोभिकरण करणार.
- घरोघरी विद्युत पुरवठा करणारे सर्व मीटर स्मार्ट मीटर मध्ये परिवर्तन करणार.




पाच वर्षे प्रगतीची...
नांदी नव्या युगाची...

# मतदारसंघात मंजुर झालेला विकासनिधी आणि आमदार निधीतील कामे

## आमदार श्री. विश्वनाथ आत्माराम भोईर यांच्या विकासकामांचा अहवाल

- कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील निधी - **१४७.३० कोटी**
- कल्याण स्मार्ट सिटी प्रकल्पातील कामे - **९३७.०८ कोटी**
- MMRDA विभागातील कामे - **९०.३८ कोटी**
- MSRDC विभागातील कामे - **८५८.०० कोटी**
- आमदार निधी - **२०.७० कोटी**
- मुलभुत सोयी सुविधा निधी - **९९.३० कोटी**
- भारतरत्न डॉ.बाबासाहेब अआंबेडकर सामाजिक विकास निधी - **१५.५० कोटी**
- राज्यातील अल्पसंख्यक बहुल नागरी क्षेत्रात कार्यकम अनुदान - **२.०० कोटी**
- अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती निधी - **९.८० कोटी**
- कल्याण स्टेशन परिसर सुधारणा प्रकल्प - **६०२.१३ कोटी**
- दुर्गाडी गणेशघाट खाडी किनाऱ्या लगत नेवल गॅलरीसह रिव्हरफ्रंट विकसित करणे. - **३६.९७ कोटी**
- रौनक सिटी ते सिटी पार्क स्मार्ट रस्ता विकसित करणे. - **६२.३८ कोटी**
- टाऊन पार्क/सिटी पार्क विकसित करणे. - **७१.४० कोटी**
- प्रबोधनकार ठाकरे सरोवर (शेनाळे तलाव) व परिसराचे सुशोभिकरण करणे.-**१९.६३ कोटी**
- कल्याण स्टेशन Foot Over Bridge नुतणीकरण. - **७९.८७ कोटी**
- स्व.दिलिप कपोते वाहन तळ. - **६१.७० कोटी**
- शिवाजी चैक आंबेडकर रोड ते अन्सारी चौक रस्ता. - **११.०० कोटी**




पाच वर्षे प्रगतीची...
नांदी नव्या युगाची...

# मतदारसंघात मंजुर झालेला विकासनिधी आणि आमदार निधीतील कामे

## आमदार श्री. विश्वनाथ आत्माराम भोईर यांच्या विकासकामांचा अहवाल

- FORTIS HOSPITAL ते वल्लीपीर रस्ता - **४.८३ कोटी**
- वल्लीपीर रोड ते चिराग हॉटेल रस्ता - **१०.६७ कोटी**
- मांडा रेल्वे फाटक ते वासुंद्री पर्यंत क्राँक्रीटीकरण रस्ता. - **१३.८६ कोटी**
- उंबर्डे येथील श्री. भरत भोईर यांच्या घरापासून जुन्या मराठी शाळेपर्यंत गटार बांधकामासह डी. पी. प्रमाणे रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. - **४.५० कोटी**
- अटाळी हनुमान मंदिर ते नारायण पाटील यांच्या घरापर्यंत बंदिस्त गटार बांधकामासह रस्ता काँक्रीटीकरण करणे. - **३.०० कोटी**
- गांधारी मुख्य रस्ता रॉयस गॅलक्सी ते महावीर हेवन पर्यंत डी. पी. प्रमाणे गटार बांधकामासह रस्ता तयार करणे. - **२.६५ कोटी**
- अष्टविनायक बिल्डींग ते चंद्रेश गॅलॅक्सी पर्यंत डी. पी. प्रमाणे गटार बांधकामासह रस्ता काँक्रीटीकरण करणे. - **४.०० कोटी**
- चंद्रेश गॅलॅक्सी ते गांधारी मुख्य रस्त्यापर्यंत गटार बांधकामासह रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. - **२.७५ कोटी**
- ओम रेसिडेन्सी ते रोनक सिटी पर्यंत C टाईप गटार बांधकामासह रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. - **४.५० कोटी**
- रामदासवाडी मुरबाड रोड लगत मस्जिद गल्ली पर्यंत डी. पी. प्रमाणे गटार बांधकामासह रस्ता काँक्रीटीकरण करणे. - **१.०५ कोटी**
- अहिल्याबाई चौक ते सहजानंद चौक पर्यंत डी. पी. प्रमाणे गटार बांधकामासह रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. - **४.२५ कोटी**
- रामदासवाडी स्नेहांजली शोरुम ते थोरे निवास पर्यंत डी. पी. प्रमाणे गटार बांधकामासह रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. - **३.०० कोटी**




पाच वर्षे प्रगतीची...
नांदी नव्या युगाची...

# मतदारसंघात मंजुर झालेला विकासनिधी आणि आमदार निधीतील कामे

## आमदार श्री. विश्वनाथ आत्माराम भोईर यांच्या विकासकामांचा अहवाल

- शहाड स्टेशन अंबर हॉटेल ते गणेश कोट यांच्या कार्यालयापर्यंत गटार बांधकामासह रस्ता कॉक्रीटीकरण करणे. - **३.५० कोटी**
- शहाड गावात गणेश कोट यांच्या कार्यालयापासून ते हनुमान मंदिर ते श्री. अशोक ढोणे यांच्या घरापर्यंत संपूर्ण शहाड गाव बंदिस्त गटार बांधकामासह रस्ता तयार करणे. - **०.५० कोटी**
- फायर ब्रिगेड पासून ते आरक्षण क्रमांक ७३ शॉपिंग कॉम्प्लेक्स पर्यंतचा २४ मीटर डी. पी. प्रमाणे गटार बांधकामासह रस्ता कॉक्रीटीकरण करणे. - **३.०० कोटी**
- मोहने सेक्टर ६ परिसरातील आरक्षण क्रमांक ५७ फायर ब्रिगेड पासून ते आरक्षण क्रमांक ७३ शॉपिंग कॉम्प्लेक्स पर्यंतचा २४ मीटर डी. पी. प्रमाणे गटार बांधकामासह रस्ता कॉक्रीटीकरण करणे - **३.०० कोटी**
- काळा तलाव येथील अदेश्वर चौक ते विकास हाईट्स पर्यंत डी. पी. प्रमाणे गटार बांधकामासह रस्ता कॉक्रीटीकरण करणे. - **४.९५ कोटी**
- पत्रीपूल नाल्यातील ब्रिज ते सर्वोदय सागर सोसायटी पर्यंत डी. पी. प्रमाणे गटार बांधकामासह रस्ता कॉक्रीटीकरण करणे. - **४.९० कोटी**
- कल्याण रिंग रूट रस्ता - **५९८ कोटी**
- वडवली पुल - **२५ कोटी**
- टिटवाळा पुर्व पश्चिम पुल - **५० कोटी**
- दुर्गाडी पुल - **१०१.७० कोटी**
- पुत्री पुल - **४०.०० कोटी**
- उंभर्णी गाव ते नांदप गाव रस्ता - **४३.३० कोटी**

विश्वासातला माणूस

पाच वर्षे प्रगतीची... नांदी नव्या युगाची...

# सामाजिक कार्य

## तरुणांसाठी रोजगार मेळावा

आपल्या मतदारसंघातील सुशिक्षीत बेरोजगार तरुण तरुणींची गरज लक्षात घेऊन गेल्या तीन वर्षांपासून सलग रोजगार मेळाव्याचे मोठ्या प्रमाणामध्ये आयोजन करत आहोत. ज्याद्वारे आतापर्यंत शेकडो बेरोजगार तरुण तरुणींना त्यांना अपेक्षित अशी नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. इतकेच नाही तर नुकत्याच झालेल्या यंदाच्या रोजगार मेळाव्यात खासगी क्षेत्रातील रोजगाराच्या संधींसह शासकीय क्षेत्रातील रोजगारही उपलब्ध करून दिले आहेत. आज अनेक युवक युवतींना या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून आपापल्या पायावर उभे राहण्याचे आणि आपल्या कुटुंबाला आधार देण्याचे बळ प्राप्त झाले आहे. याचा तर मनापासून अतीव आनंद आहे.






## शैक्षणिक कार्यक्रम

आपल्या मतदारसंघातील होतकरु आणि हुशार विद्यार्थ्यांनी शालेय, महाविद्यालयीन किंवा इतर व्यावसायिक परीक्षांमध्ये मिळवलेल्या घवघवीत यशाने शहराचेही नाव मोठे होत असते. त्यामुळे अशा गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करणे हे क्रमप्राप्त असून अशा विद्याथ्यर्थ्यांचे जाहीर गुणगौरव समारंभांद्वारे कौतुक केले, तसेच स्पर्धा परीक्षेमध्ये पैकीच्या पैकी गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचेही त्यांच्या घरी जाऊन कौतुक करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच मतदारसंघातील गरजू विद्यार्थ्यांना मोफत वह्या आणि छत्र्यांचे वाटप करत त्यांना सहकार्य करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे.









## ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध उपक्रम

मतदारसंघातील ज्येष्ठ नागरिकांची मोठी संख्या पाहता त्यांच्यासाठी मनोरंजन तसेच विरंगुळा केंद्र उभारण्यात आली आहेत. यासोबतच ज्येष्ठ नागरिक कट्टे, आजी-आजोबा पार्कची संख्या देखील वाढविण्यात आली आहे. तर, दर महिन्याला सार्वजनिकरित्या ज्येष्ठ नागरिकांचे वाढदिवसही साजरे केले जात आहेत. ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या सोडवण्यासह त्यांना शासकिय योजनांचा लाभ मिळावा यासाठी विशेष लक्ष देऊन अनेक उपक्रम आयोजित केले. या उपक्रमाच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिक कार्ड बनवणे व शासनाच्या विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत.



ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र



ज्येष्ठ नागरिक भवन पारनाका

## ज्येष्ठ नागरीक सन्मान व छत्री वाटप सोहळा












# सांस्कृतिक, धार्मिक कार्ये

## • पारनाका गणेश मंदिर जीर्णोद्धार



जुन्या आणि ऐतिहासिक कल्याण गावाची ओळख आणि इतिहासाचे साक्षीदार असलेल्या काही प्रमुख ठिकाणांपैकी एक असलेला पारनाका हा कल्याणकरांसाठी कायम जिव्हाळ्याचा विषय राहिला आहे. या पाराला ऐतिहासिक आणि अध्यात्मिक वारसाही लाभलेला आहे.

याठिकाणी असलेला पार आणि त्याखाली असणारे श्री. गणरायाचे मंदिर हे अनेकांचे श्रद्धास्थान आहे. मात्र, काळाच्या ओघात जिर्णावस्थेत गेलेल्या मंदिराचे जतन करणे आवश्यक होते. स्थानिकांनीही त्यासाठी आपल्याकडे तशी विनंती केली होती. या विनंतीनुसार, सर्वांचे संकट हरण करणाऱ्या या अधिपतींच्या मंदिराचा जीर्णोद्धार तसेच त्याशेजारील परिसराचा विकासात्मक कायापालट करण्यासाठी तब्बल 1 कोटी रुपयांचा भरीव निधी शासनाकडून उपलब्ध करून घेतला आणि त्यातून आज अतिशय सुंदर असे मंदिर आणि परिसराचे निर्माण काम होऊ शकले. ही देखील त्या गणेशाचीच कृपादृष्टी. कारण आपण केवळ निमित्तमात्र, 'सर्व कर्ता करविता, तर शेवटी तोच!'

## • किल्ले दुर्गाडी नवरात्रौत्सव



संपुर्ण कल्याण नगरीचे श्रद्धास्थान असलेल्या दुर्गाडी किल्ल्यावरील नवरात्रौत्सव हा येथील नागरिकांचा प्रिय उत्सव आहे. याच अनुषंगाने शिवसेनेतर्फे दरवर्षी साजऱ्या होणाऱ्या किल्ले दुर्गाडी येथील नवरात्रौत्सवामध्ये केवळ कल्याणच नव्हे तर आसपासच्या परिसरातील लाखो भाविक दर्शनासाठी येत असतात.

या कल्याण नगरीतील सर्वात मोठ्या धार्मिक आणि सांस्कृतिक सोहळ्याचे आयोजन करण्याची आणि दुर्गाडी देवीची सेवा करण्याची संधी आपल्याला प्राप्त झाली. सुरुवातीला शिवसेना कल्याण शहरप्रमुख म्हणून आणि आता आमदार म्हणून ही परंपरा आणि आपला धार्मिक वसा आजही कायम राखला आहे.

आणि यापुढेही तो असाच कायम राहील.



## • माघी गणेशोत्सव



सलग गेल्या 30 वर्षापासून कल्याण पश्चिममध्ये शिवप्रेमी माघी गणेशोत्सव मंडळाच्या वतीने दरवर्षी नवसाला पावणाऱ्या गणरायाचा माघी गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. यावेळी आकर्षित धार्मिक वास्तू तसेच देखावे उभारून समाजपयोगी कार्यक्रम राबविण्यावर भर दिला जातो.

या काळात भजन, किर्तन, अथर्वशीर्षपठन यांसारख्या धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. तसेच विविध समाजपयोगी कार्यक्रम देखील आयोजित केले जातात. गणेशोत्सवाच्या सातव्या दिवशी सुंदर अशी शोभा यात्रा काढून सामाजिक बांधिलकी जपत भक्तिमय वातावरणात बाप्पाला निरोप दिला जातो. हा माघी गणेशोत्सव ठाणे जिल्ह्यात अव्वल मानला जातो.


## • श्रीराम मंदिर प्रतिकृतीची उभारणी



तब्बल 500 वर्षांच्या संघर्षानंतर अयोध्येत प्रभू श्रीरामांचे मंदिर साकारले गेले. मात्र, अनेकांना अयोध्या हे मंदिर पाहायला जाणे शक्य नसल्याने माघी गणेशोत्सवाच्या निमित्ताने प्रभू श्रीराम मंदिराची अतिभव्य अशी प्रतिकृती साकारली होती.

ही प्रतिकृती पाहण्यासाठी भाविकांनी गर्दी केली होती. गेल्या 30 वर्षांपासून अखंडपणे हा माघी गणेशोत्सव आपण साजरा करत आहोत. ज्याला परिसरातील हजारो भक्त भेट देऊन श्री गणेशाचे दर्शन घेतात.

## • भगवा तलाव येथे छत्रपती शिवाजी महाराज दीपोत्सव






हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने आपली कल्याण भूमी पावन झाली आहे. त्यांचे व त्यांच्या पराक्रमाचे स्मरण ठेवत छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल आदर आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी अभिनव असा 'दिपोत्सव' उपक्रम कल्याणमध्ये पहिल्यांदाच राबवण्यात आला.

भगवा तलाव येथील हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्मारक परिसरात हजारो दिवे प्रज्वलित करून अनोख्या पद्धतीने छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यात आले. यावेळी दिव्यांच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांची 10 बाय 10 फूटांची भव्य प्रतिकृती साकारण्यात आली होती.








## ● दादर येथील चैत्यभूमीची प्रतिकृती

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याप्रमाणे आंबेडकरी अनुयायांच्या मनामध्ये दादर येथील चैत्यभूमीचे वेगळे स्थान आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील लाखो आंबेडकरी अनुयायी 6 डिसेंबरला चैत्यभूमीवर बाबासाहेबांना वंदन करण्यासाठी येत असतात. याच धर्तीवर आपल्या मतदारसंघामध्येही दादर येथील चैत्यभूमीची प्रतिकृती साकारली होती. याठिकाणीही बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी आंबेडकरी अनुयायांनी गर्दी केली होती. तसेच यंदा प्रथमच कल्याण पश्चिम येथील कै. आत्माराम भोईर चौकातून या अनुयायांनी CALNDLE MARCH काढून बाबासाहेबांना अभिवादन केले.

## ● कै. प्रल्हाद शिंदे स्मारकाचे नुतनीकरण




महाराष्ट्राचे लोकगायक, स्वरसम्राट कै. प्रल्हाद शिंदे यांच्या स्मारकाचे नुतनीकरण करण्याचे भाग्य आपल्याला लाभले. या लोक गायकाने आपल्या पहाडी आवाजाच्या शब्दांतून उभ्या महाराष्ट्राला विठ्ठलाचे दर्शन घडवले. अशा या लोकगायकाचे स्मारकही त्याच्या कीर्तीला साजेल असे हवे. नेमका हाच विचार डोळ्यासमोर ठेऊन आपण या स्मारकाच्या नूतनीकरणाचे काम हाती घेतले असून पहिल्या टप्प्यातील काम पूर्ण झाले आहे आणि पुढील कामही आता लवकरात लवकर पूर्णत्वास नेण्यात येईल. तत्पूर्वी आपल्या नगरसेवक पदाच्या कार्यकाळात या लोकगायकासाठी आपण स्वतःहून पुढाकर घेत स्मारकासाठी जागाही उपलब्ध करून दिली. इतक्या मोठ्या व्यक्तीचे स्मारक आपल्या मतदारसंघात करण्याचे भाग्य आपल्याला लाभले यासाठी मी स्वतःला नशीबवान समजतो.



## बुध्दीबळ स्पर्धा, कबड्डी, क्रिकेट स्पर्धेचे यशस्वी आयोजन

आपल्या मतदारसंघातील खेळाडूंना प्रोत्साहन आणि त्यांच्यातील खेळाडूला वाव देण्यासाठी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यापैकी एक म्हणजे आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या धर्तीवर झालेली राष्ट्रीय बुद्धीबळ चषक स्पर्धा. सलग दोन वर्षे आयोजित केलेल्या या स्पर्धेमध्ये कल्याणातील शेकडो उदयोन्मुख खेळाडूंनी सहभाग घेतला आणि आपल्यातील कौशल्याची चुणूक दाखवली. या बुद्धीबळ स्पर्धेसोबतच कबड्डी स्पर्धा, क्रिकेट स्पर्धा अशा विविध खेळांचे आयोजनही करण्यात आले होते.























# स्मार्ट सिटी प्रकल्प





कल्याण स्टेशन परिसर सुधारणा प्रकल्प





दुर्गाडी गणेशघाट खाडी किनाऱ्यालगत नेवल गॅलरीसह
रिव्हरफ्रंट विकसीत करणे.


विश्वासातला माणूस



रौनक सिटी ते सिटी पार्क रस्ता विकसीत करणे.



टाऊन पार्क / सिटी पार्क विकसीत करणे.



प्रबोधनकार ठाकरे सरोवर (शेनाळे तलाव/काळातलाव) व

परिसराचे सुशोभिकरण करणे.

## कोविडची परिस्थिती होती बिकट
## एकजूटीने परतूनी लावीले जागतिक संकट







डॉक्टर्स आर्मीसोबतच ट्रॅफिक आणि इतर पोलिसांसाठी पीपीई किट,
मास्क आणि सॅनिटायझर आदी अत्यावश्यक गोष्टींचे वाटप.






अचानक लागलेल्या लॉकडॉऊनमुळे अनेक जण जिथल्या तिथे अडकून पडले होते.
त्यांच्यासाठी कोवीड काळात कम्युनिटी किचन सुरु करून सलग 90 दिवस केली जेवणाची सोय








अधिकाधिक कोवीड टेस्टिंगसाठी RTPCR किट उपलब्ध व्हावा
यासाठी महापालिकेकडे निधी वर्ग



मोफत कोवीड लसीकरण मोहिम



पोलीस बांधवांना जीवनावश्यक वस्तुंचे वाटप.





मतदारसंघांतील गरजू कुटुंबांना केले मोफत रेशन धान्यांचे वाटप.



कोवीड रुग्णांना ठाणे, मुंबई आणि कल्याणमध्ये हॉस्पिटल बेड उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक ती केली कार्यवाही.



ऑक्सिजन प्लॅन्टच्या उभारणीसाठी तब्बल 1 कोटी रुपयांचा निधी केला उपलब्ध

- संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण डॉक्टर्स आर्मी स्थापन करण्यात घेतला सहभाग.
- स्वखर्चातून आर्सेनिक अल्बम होमिओपॅथी गोळ्यांचे संपूर्ण मतदारसंघात केले मोफत वितरण
- केडीएमसीला उपलब्ध करून दिल्या रुग्णवाहिका.
- कोवीड काळात अनेक रुग्णांसाठी रेमडीसिविर इंजेक्शन उपलब्ध करून दिले.
- अनेक रुग्णांची हॉस्पिटलचे वाढीव बिलं कमी करून घेतली व काही गरजू रुग्णांची बिलं स्वः खर्चातून भरली.
- परराज्यातील नागरिकांना त्यांच्या गावी जाण्यासाठी वाहतुकीची व्यवस्था करून दिली.




## शब्द दिला.. पुर्ण केला...

### 1. 'सॅटिस' प्रकल्प

कल्याण स्टेशन परिसर वाहतुक कोंडीमुक्त करण्याकरिता स्मार्ट सिटी योजने अंतर्गत सुरु असणारा 'सॅटिस' प्रकल्पाचे (स्टेशन एरिया ट्रॉफिक इम्प्रूव्हमेंट सिस्टीम) काम प्रगतीपथावर आहे...



### 2. रिंग रोड प्रकल्प



कल्याण पश्चिम मतदारसंघातून जाणाऱ्या महत्त्वाकांक्षी डोंबिवली कल्याण- मांडा-टिटवाळा या रिंग रोड प्रकल्पाचे आपल्या मतदारसंघातील 90 टक्के काम पूर्ण झाले आहे. उर्वरित कामातील अडथळे दूर झाले असून हे काम प्रगती पथावर आहे.

### 3. 'उन्नतमार्ग'

कल्याण शहरातील वाहतूक समस्या सोडविण्या करिता भवानी चौक ते विठ्ठलवाडी 'उन्नतमार्ग' या उड्डाणपूलाला नुकतीच एमएमआरडीए ची मान्यता मिळाली आहे. याची एकूण लांबी 2.5 किलोमीटर इतकी असून यासाठी 700 कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आले आहेत.







पाच वर्षे प्रगतीची...
नांदी नव्या युगाची...

# शब्द दिला.. पुर्ण केला...

## 4. पत्री पूल

कल्याण पश्चिम आणि पूर्वेसाठी महत्त्वाचा दुवा असणारा पत्री पुल म्हणजेच आई तिसाई देवी उड्डाणपूल हा नागरिकांसाठी खुला करण्यात आला आहे. तसेच या नव्या पुलाशेजारीच आणखी एका तिसऱ्या उड्डाणपुलाचे काम प्रगतीपथावर आहे.





## 5. दूर्गाडी पूल -

कल्याणहून भिवंडी तसेच ठाण्याच्या दिशेने जाण्यासाठी अत्यावश्यक असलेल्या दुर्गाडी खाडीवरील प्रशस्त अशा सहा पदरी नव्या उड्डाणपुलाचे काम पाठपुराव्याद्वारे पुर्ण करून घेतले.

## 6. मांडा-टिटवाळा पूल मांडा

टिटवाळा रेल्वे क्रॉसिंग बंद करून, तेथे नव्याने उड्डाणपुल बांधण्यात आला आहे. यामुळे वाहनचालकांचा वेळ वाचण्यासोबतच लोकल तसेच बाहेरगावी जाणाऱ्या मेल एक्सप्रेसचा खोळंबा थांबण्यास मोठी मदत झाली आहे.





## 7. वडवली उड्डाणपुल

साधारणपणे दशकभरापासून प्रलंबित असलेला वडवली उड्डाणपुल हा पाठपुरावा करून पुर्णत्वास नेला व नागरिकांसाठी खुला करण्यात आला.


विश्वासातला माणूस

पाच वर्षे प्रगतीची...
नांदी नव्या युगाची...

# शब्द दिला.. पुर्ण केला...

## 8. अद्ययावत सिग्नल यंत्रणा

कल्याण शहरातील वाढती वाहन संख्या आणि वाहतूक कोंडी लक्षात घेता वाहतूकीच्या नियोजनासाठी शहरातील प्रमुख मार्गावर अद्यायावत सिग्नल यंत्रणा सुरु करण्यात आली आहे.







## 9. काँक्रीट रस्ते निर्मिती

दरवर्षी पावसाळ्यात मतदारसंघातील रस्त्यांवर पडणारे खड्डे आणि रस्ते दुरुस्त करण्यासाठी महापालिकेकडून कोट्यावधींचा खर्च होत असतो ही बाब लक्षात घेऊन शहरातील प्रमुख रस्त्यांसह अंतर्गत रस्तेही एमएमआरडीए आणि राज्य शासन यांच्या मार्फत सिमेंट काँक्रीटचे केले जात आहेत.

## 10. मेट्रो प्रकल्प

कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघासाठी गेमचेंजर प्रकल्प असलेल्या कल्याण-भिवंडी-ठाणे मेट्रो प्रकल्पासाठी विशेष लक्ष घालून पाठपुरावा केला जात आहे. याचाच एक भाग म्हणून या मेट्रो प्रकल्पाचे दुर्गाडी-खडकपाडा मार्गे टिटवाळ्यापर्यंत विस्तारीकरण करण्यास प्रस्तावित आहे.





# मैदाने, उद्याने, क्रीडांगणे, मनोरंजन केंद्रे

**1. शूटिंग रेंज-** शूटींग रेंज- नेमबाजीच्या क्षेत्रात आपले करिअर घडवण्याची इच्छा असणाऱ्या युवा वर्गासाठी कल्याणमध्ये राष्ट्रीय दर्जाचे शूटिंग रेंज उभारण्यात येत आहे. 10 मीटर आणि 25 मीटर अशा दोन प्रकारच्या शूटिंग रेंज उभारण्यात येणार असून एकावेळी दोन्ही ठिकाणी प्रत्येकी 6-6 खेळाडू सराव करू शकणार आहेत. या शूटिंग रेंज उभारणीसाठी आमदार निधीतून आतापर्यंत 75 लाखांचा निधी उपलब्ध करून दिला असून आणखीन 25 लाख तर केडीएमसी प्रशासनाकडून 50 लाखांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

**2. सिटी पार्क प्रकल्प -** वचननाम्यामध्ये सांगितल्याप्रमाणे कल्याणमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचा 'सिटी पार्क' प्रकल्प पूर्णत्वास आला आहे.

**3. अद्यायावत मैदानाची उभारणी -** अद्यायावत मैदानाची उभारणी- बारावे प्रभाग क्रं. ४ येथे फुटबॉलसाठी स्वतंत्रपणे अद्यायावत मैदानाची उभारणी केली जात आहे. यासाठी १ कोटी रूपयांचा निधी देण्यात आला आहे. याठिकाणी फुटबॉल खेळाडूंसाठी विशेष सोयीसुविधा निर्माण केल्या जात असून भविष्यात या मैदानाच्या माध्यमातून अनेक उदयोन्मुख खेळाडू तयार होतील. बॉक्सिंग रिंग येथे बॉक्सिंग रिंगचा फोटो टाकणे.

**4.** आपल्या मतदारसंघातील खेळाडूंना चांगली मैदाने उपलब्ध होण्यासाठी ठिकठिकाणी खेळाची मैदाने विकसित केली जात आहेत. तसेच सद्यपरिस्थितीत असलेल्या मैदानांमध्ये अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येत आहे. तसेच अस्तित्वात असलेल्या उद्यानांना कायमस्वरूपी सुस्थितीत ठेवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

**5. बॉक्सिंग रिंग -** म्हसोबा मैदान, प्रभाग क्र.24 येथे बॉक्सिंग रिंगसाठी तब्बल 1 कोटी रुपये निधी उपलब्ध करून दिला असून हे काम प्रगतीपथावर आहे.







# पर्यटन स्थळांचा विकास

## • 1. टिटवाळा महागणपती

लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले श्रीमहागणपती क्षेत्र टिटवाळा मंदिर हे राज्यातील पुरातन मंदिरांपैकी एक मंदिर आहे. या पार्श्वभूमीवर टिटवाळ्याला पर्यटनस्थळाचा दर्जा देऊन त्यानुसार हे क्षेत्र विकसित करण्यात यावे, अशी आग्रही मागणी विधीमंडळात केली आहे व त्याचा सखोल पाठपुरावा मा. मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्याकडे सुरु आहे.




## • 2. किल्ले दुर्गाडी

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या दुर्गाडी किल्ला, दुर्गादेवीच्या मंदिराचा विकास व संवर्धन व्हावे, तसेच हे पर्यटन स्थळ म्हणून विकसित करावे यासाठी देखील विधीमंडळात सातत्याने मागणी करून पाठपुरावा करण्यात येत आहे.

तसेच किल्ल्याच्या डागडुजीसाठी विशेष निधी उपलब्ध करून घेत डागडुजीचे काम हे प्रगतीपथावर आहे.



# पाणी पुरवठा योजना

1. कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघातील वाढत्या लोकसंख्येचा प्रश्न विचारात घेत पाण्याचे प्रभावी नियोजन करत जुन्या जलवाहिन्या बदलून त्या जागी नविन जलवाहिन्या टाकण्यात आल्या आहेत.
2. मतदारसंघात मुबलक पाणीपुरवठा व्हावा यासाठी ठिकठिकाणी नवीन जलकुंभ उभारले जात आहेत. त्यासोबतच अस्तित्वात असलेल्या जलकुंभांच्या देखभाल दुरुस्तीचे कामही युद्धपातळीवर प्रगतीपथावर आहे.





## शैक्षणिक

1. टिटवाळा येथे मेडिकल कॉलेज उभारण्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा सुरु आहे.
2. आपल्या मतदारसंघातील कल्याण पश्चिमेत असलेल्या मुंबई युनिवर्सिटी उपकेंद्राच्या विस्तारीकरणासाठी शासन दरबारी आवश्यक ते प्रयत्न सुरु आहेत.
3. शहरात ठिकठिकाणी विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका सुरु करणार.
4. युवकांसाठी नित्य नियमाने करिअर, रोजगार विषयक मार्गदर्शन मेळावे आयोजित करून युवकांना रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध करुन दिल्या.
5. अटाळी येथील वाल्मिकी शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमिक शाळेच्या इमारत बांधकामासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करून दिला.

## ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक


1. आपल्या मतदारसंघातील महिला बचत गटांच्या सक्षमीकरणासाठी शासकीय योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी केली. उदा. लेक लाडकी, मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना इ.
2. मतदारसंघातील महिला भगिनींसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून, त्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले. याचसोबत मतदारसंघात हळदी-कुंकू समारंभ, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.
3. मतदारसंघातील ज्येष्ठ नागरिकांची मोठी संख्या पाहता त्यांच्यासाठी मनोरंजन तसेच विरंगुळा केंद्र उभारण्यात आली आहेत. यासोबतच ज्येष्ठ नागरिक कट्टे, आजी-आजोबा पार्कची संख्या देखील वाढविण्यात आली आहे. तर, दर महिन्याला सार्वजनिकरित्या ज्येष्ठ नागरिकांचे वाढदिवसही साजरे केले जात आहेत.
4. ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या सोडवण्यासह त्यांना शासकिय योजनांचा लाभ मिळावा यासाठी विशेष लक्ष देऊन अनेक उपक्रम आयोजित केले. या उपक्रमाच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिक कार्ड बनवणे व शासनाच्या विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत.
5. ज्येष्ठ नागरिक कट्टा ज्येष्ठ नागरिकांसाठी माऊली ज्येष्ठ नागरिक कट्टा यासाठी तीन हॉल बांधण्यात आला आहे. तसेच प्रभाग क्र. 24 येथे सिद्धीविनायक चाळ परिसरात सावली ज्येष्ठ नागरिक कट्टा यासाठी हॉल बांधण्यात आला.
6. अद्ययावत व्यायामशाळा युवकांची आरोग्याप्रती असणारी सध्याची जागरुकता पाहता उंबर्डे येथे अद्ययावत व्यायामशाळा (जिम) उभारली जात आहे.




पाच वर्षे प्रगतीची...
नांदी नव्या युगाची...

# स्मार्ट सिटी प्रकल्प

1. सी.सी.टी.व्ही कॅमेरे मतदारसंघातील नागरिकांच्या सुरक्षतेच्या दृष्टीने स्मार्ट एलिमेंटस् प्रकल्पा अंतर्गत ठिकठिकाणी सी.सी.टी.व्ही कॅमेऱ्यांचे जाळे बसविण्यात आले आहे. या सी.सी.टि.व्ही. कॅमेऱ्यांमार्फत शहरात होणाऱ्या प्रत्येक हालचालींवर पोलीस प्रशासन लक्ष ठेवत आहे. तसेच आपात्कालीन स्थितीत प्रशासकीय यंत्रणेचा नियोजन आणि समन्वय योग्यरितीने होण्यासाठी कल्याण डोंबिवली महानगरपालिका मुख्यालयात इंटिग्रेटेड कमांड कंट्रोल सेंटरची स्थापना करण्यात आली आहे.
2. मतदारसंघामधील रस्ते रात्रीच्या अंधारात प्रकाशमय होण्यासह वाढत्या विज बीलातून महापालिकेची सुटका व्हावी यासाठी संपूर्ण मतदारसंघात एलईडी स्ट्रीट लाईट बसविण्यात आले आहेत.
3. शहरात सर्व शासकीय इमारतींवर सौर उर्जा वापरून विजेची बचत करण्यासाठी पाठपुरावा केला असून त्या दृष्टीने कल्याण डोबिंवली महानगरपालिकेच्या नव्याने बांधण्यात आलेल्या इमारतींवर ही यंत्रणा बसविण्यात आली आहे.
4. मतदारसंघामध्ये असलेला विस्तीर्ण खाडीकिनारा लक्षात घेता हा परिसर विकसित करून तेथे रिव्हर फ्रंट डेव्हलपमेंट प्रकल्प राबविण्यासाठी शासनस्तरावर विशेष प्रयत्न केले जात आहेत.
5. मतदारसंघामध्ये मोठ्या संख्येने तलाव असून शहरातील या तलावांचे भगवा तलावाच्या धर्तीवर सुशोभिकरण करण्यात येत आहे. या सुशोभिकरणाच्या पहिल्या टप्प्यात विविध तलावांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.









# सार्वजनिक आरोग्य सुविधा

1. कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघात अद्यायावत असे शासकीय रुग्णालय नसल्यामुळे येथील नागरिकांना कळवा, ठाणे, मुंबई गाठावे लागते, ही बाब लक्षात घेऊन 'अद्यायावत बाबींनी परिपूर्ण असलेले सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल' उभारण्यात यावे, याकरिता राज्याचे मुख्यमंत्री मा.श्री. एकनाथजी शिंदे साहेब यांच्याकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा करण्यात येत आहे व मुख्यमंत्र्यांनी यासाठी तत्वतः मान्यता दिली असून हे काम लवकरात लवकर सुरु होणार आहे.

2. 'वंदनीय बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' या राज्य शासनाच्या उपक्रमा अंतर्गत कल्याण पश्चिम मतदारसंघात एक केंद्र उभारण्यात आले आहे.

3. कोविडनंतर आरोग्य सुविधा वाढविण्यासाठी विशेष लक्ष दिले जात असून कल्याण डोंबिवली महापालिकेच्या प्राथमिक आरोग्य केंद्राची संख्या वाढावी यासाठी पाठपुरावा करून वाढविण्यात आली आहे. यामुळे आता नागरिकांना सहज आणि उत्तम आरोग्य सुविधा उपलब्ध झाल्या आहेत.

4. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत मतदारासंघातील हजारो गरजू रुग्णांना मोफत वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्यात आली.

5. **आरोग्य शिबीर-** कल्याण पश्चिम मतदारसंघात विविध आरोग्य तपासणी शिबीरे आयोजित करून नागरिकांना मोफत औषधांचे वितरण करण्यात आले. याला नागरिकांचा देखील उत्स्फुर्त असा प्रतिसाद मिळाला असून मतदारसंघात विविध ठिकाणी असे शिबीर राबविण्यात येत आहे.

6. **रक्तदान शिबीर -** धर्मवीर आनंद दिघे साहेबांच्या आदेशानुसार मागील 28 वर्षांपासून कल्याण पश्चिममध्ये शिवसेना, उंबर्डे कोळीवली शाखेतर्फे भव्य रक्तदान शिबीर आयोजित करण्यात येते. या रक्तदान शिबिरामध्ये हजारो रक्तदाते रक्तदान करून आपले योगदान देतात. तसेच या रक्तदान शिबीराच्या माध्यमातून रक्तदान करण्यात आलेल्या रक्तसंकलित नमुन्यांचे मोफत गरजवंतांना वाटप करण्यात येते.








पाच वर्षे प्रगतीची...
नांदी नव्या युगाची...

# शासनाच्या लोककल्याणकारी योजना

## आयुष्यमान भारत

आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांना आरोग्याच्या सुविधा व विविध आजारांवरील उपचार मोफत घेता यावेत यासाठी शासनाकडून आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना राबविली जात आहे. देशातील कोट्यवधी लोक या योजनेत सहभागी झाले असून या योजनेतून लाभार्थ्याला 5 लाखापर्यंतचे मोफत उपचार दिले जातात.

## महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना (MJPJAY)

महाराष्ट्रात महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेसह आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना एकत्रितपणे सुरु करण्यात आली आहे. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना ही राज्य सरकारतर्फे राबवली जाणारी आरोग्य विमा योजना आहे. यामध्ये लाभार्थी रुग्णांना 5 लाखांपर्यंतचा आरोग्यविमा सहज उपलब्ध करून दिला जातो.

## मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतंर्गत अल्प उत्पन्न गटातील 21 ते 65 वयोगटाच्या महिलांना महिन्याला 1500 रुपयांची आर्थिक मदत मिळणार महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, पोषणासाठी, आरोग्यासाठी ही योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत राज्यातील महिलांना वर्षाला 18000 रुपये देण्यात येणार आहेत.

## लेक लाडकी योजना

महाराष्ट्र सरकारने मुलींच्या सक्षमीकरणासाठी लेक लाडकी योजना अंमलात आणली आहे. या योजनेच्या माध्यमातून गरीब कुटुंबातील मुलींना लखपती करण्याचा निर्णय सरकारनं घेतला आहे. महाराष्ट्रात 1 एप्रिल 2023 पासून जन्मलेल्या मुलींना 'लेक लाडकी' योजनेअंतर्गत 1 लाख 1 हजार रुपये आर्थिक मदत देण्यात येणार आहे.

मुलींच्या जन्मास प्रोत्साहन देऊन मुलींचा जन्मदर वाढवणे, मुलींच्या शिक्षणास चालना देणे, बालविवाह रोखणे, कुपोषण कमी करणे, शाळा बाह्यमुलींचे प्रमाण शून्यावर आणण्यासाठी प्रोत्साहित करणे यासाठी मुलींच्या सक्षमीकरणासाठी 'लेक लाडकी' ही योजना राज्यात सुरु करण्यात आली आहे.



## मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना

राज्य सरकारच्या वतीने मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना राबविण्यात येत आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेच्या पात्र लाभार्थ्यांना अन्नपूर्णा योजनेचा देखील लाभ घेता येणार आहे. या योजनेंतर्गत राज्य सरकारच्या वतीने राज्यातील लाभार्थी कुटुंबियांना दरवर्षी 3 गॅस सिलिंडर मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

## युवा कार्य प्रशिक्षण योजना

शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्य विभाग आणि मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे लाडका भाऊ योजना म्हणजेच युवा कार्य प्रशिक्षण योजना राबविण्यात येणार आहे. या योजने अंतर्गत 12 वी पास तरुणांना दरमहा 6 हजार, डिप्लोमा झालेल्या तरुणाला 8 हजार तर पदवीधर तरुणाला 10 हजार रुपये महिना मिळतील.

या योजनेतील तरुण वर्षभर एखाद्या कंपनीत अप्रेन्टिसशिप करेल, त्यानंतर तिथे त्याला कामाचा अनुभव मिळेल आणि त्या अनुभवाच्या जोरावर त्याला नोकरी देखील मिळेल. या योजनेनुसार राज्यातील तरूण ज्या कंपनीत काम करतील, अप्रेन्टिसशिप करतील, तिथे त्यांच्यासाठी आपलं सरकार पैसे भरणार आहे. त्याचबरोबर त्यांना स्टायपंड देईल. इतिहासात पहिल्यांदाच आपल्या सरकारने अशा प्रकारची योजना आणली आहे.

## मुख्यमंत्री वैद्यकिय सहाय्यता निधी

राज्यातील गंभीर आजारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांना मदत करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्या संकल्पनेतून मुख्यमंत्री वैद्यकिय सहाय्यता निधी उपलब्ध करून दिला जात असून राज्यातील लाखो रुग्णांना याचा फायदा झाला आहे.

## महिला 50 टक्के सवलत

राज्य शासनाने जाहिर केल्याप्रमाणे राज्यातील सर्व महिलांना एसटीमधून प्रवास करताना विशेष सवलत देण्यात आली आहे. या सवलती अंतर्गत महिलांना तिकिट दरात तब्बल 50 टक्के सवलत देण्यात आली आहे.

## ज्येष्ठ नागरिकांना मोफत एसटी प्रवास

महाराष्ट्रातील 75 वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना संपूर्ण महाराष्ट्रभर फिरण्यासाठी राज्यशासनाने एसटी प्रवास मोफत केला आहे.



# प्रस्तावित व पाठपुरावा सुरु असलेली कामे

## 1. कल्याण शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी स्वतंत्र धरण

कल्याण शहराची झपाट्याने वाढणारी लोकसंख्या पाहता भविष्यात पाण्याचा अभाव पडू नये यासाठी कल्याण शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी स्वतंत्र धरण तयार करावे, यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा सुरु असून हे धरण लवकरात लवकर मंजूर व्हावे यासाठी प्रयत्न करत आहोत.

## 2. सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल

कोरोना परिस्थितीनंतर कल्याण पश्चिममधील आरोग्य यंत्रणेला बळकटी देण्यासाठी व कल्याणमधील नागरिकांना उत्तम दर्जाच्या आरोग्य सुविधा प्रधान करण्याच्या दृष्टीने कल्याण पश्चिममध्ये सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल उभारण्याची मागणी केली असून याचा सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे.

## 3. प्रशासकीय इमारत

कल्याण पश्चिममधील प्रशासकीय इमारती अद्यायावत यंत्रणांनी सुसज्ज असाव्यात व नागरिकांना या प्रशासकीय इमारतीच्या माध्यमातून विविध कामे एकाच ठिकाणी करता यावीत यासाठी प्रशासकीय इमारती आधुनिकतेने तयार करण्याचे काम प्रस्तावित आहे.

## 4. वारकरी भवन

कल्याण हे आध्यात्मिक शहर म्हणून ओळखले जाते. या शहरातील वारकरी सांप्रदायाची परंपरा पाहता हरिनाम सप्ताह, पारायणे, भक्तिमय कार्यक्रम, अध्यात्मिक कार्यक्रम येथील वारकरी भक्तजनांना करता यावेत यासाठी मतदारसंघात वारकरी भवन उभारण्याचा मानस आहे.

## 5. आगरी कोळी भवन

कल्याण हे शहर खाडी किनारी वसलेले शहर आहे. या शहरात आगरी-कोळी समाज मोठ्या संख्येने आणि गुण्यागोविंदाने राहतो. या आगरी-कोळी समाजाची संस्कृती, परंपरा आणि चालीरिती टिकाव्यात व येणाऱ्या पिढ्यांना कळाव्यात यासाठी आगरी-कोळी समाज भवन उभारण्याची मागणी शासनस्तरावर करण्यात आली असून याचा पाठपुरावा करण्यात येत आहे.




पाच वर्षे प्रगतीची...
नांदी नव्या युगाची...

## 6. अद्यायावत अभ्यासिका

शिकेल भारत, तरच पुढे जाईल भारत, या भावनेने स्पर्धा परिक्षेसह शालेय अभ्यासाठी व वाचन संस्कृती जोपासण्यासाठी कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघात अद्यायावत अशी अभ्यासिका उभारणे गरजेचे आहे. हे काम प्रस्तावित असून आपण अभ्यासिका उभारणीस सकारात्मक आहोत. (चेक करणे.)

## 7. पोलीस कर्मचारी वसाहत

पोलीस कर्मचारी बांधवांना हक्काचा आसरा मिळावा व त्यांनी आपल्या कुटुंबियांसोबत वेळ घालवावा यासाठी कल्याण पश्चिममतदारसंघात पोलीस कर्मचारी वसाहत उभारण्याचे काम प्रस्तावित असून शासनस्तरावर याचा पाठपुरावा करत आहोत. (चेक करणे.)

## 8. मेट्रो मार्गिका विस्तार

कल्याण पश्चिम मतदारसंघात प्रस्तावित असलेल्या मेट्रो प्रकल्पाच्या मार्गिकेचा विस्तार व्हावा यासाठी देखील शासनस्तरावर प्रयत्न करत असून याला देखील सकारात्मक स्वरुप प्राप्त होईल. कल्याणमधील वाहतूकीला यामुळे नवा पर्याय उपलब्ध होईल.

## 9. दुर्गाडी व टिटवाळा पर्यटन केंद्राचा विकास

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पशनि पावन झालेल्या दुर्गाडी किल्ल्याचा व टिटवाळ्यातील श्री श्रेत्र गणेश मंदिर या दोन्ही ठिकाणच्या पर्यटनाच्या दृष्टीने विकास व्हावा यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा सुरु आहे.

## 10. ए.सी.पी., डी.सी.पी. वाहतूक शाखा व एम.एफ.सी. पोलीस स्टेशन साठी स्वतंत्र इमारत

## 11. अद्यायावत क्रीडांगण

मतदारसंघातील तरुण खेळाडूंना अद्यायावत बाबींनी परिपूर्ण असलेले क्रीडांगण बनवण्याचा आमचा मानस असून या क्रीडांगणाच्या माध्यामतून आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू बनावेत व त्यांना देशाचं नावं मोठं करावं हा हेतू मनामध्ये ठेवून शासनाकडे हा प्रस्ताव पाठविला आहे.

## 12. घनकचरा प्रकल्प

कल्याण शहरातील कचऱ्याची योग्यरित्या विल्हेवाट लावून त्यापासून कंपोस्ट खताची निर्मिती करता यावी व कचरा वर्गीकरणासाठी यंत्रणा उभी राहावी यासाठी घनकचरा प्रकल्पाची मागणी शासनाकडे करण्यात आली असून याबाबतचा पाठपुरावा करण्यात येत आहे.






# शिवसेना




## महायुती सरकारचे पाऊल
## क्रांतिकारी पर्वाची चाहूल

### मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना



२१ ते ६५ वयोगटातील महिलांना दरमहा १५०० अनुदान

### मुलींना पदवीपर्यंत शिक्षण मोफत



पात्र मुलींच्या शिक्षणाचा संपूर्ण खर्च सरकार करणार

### मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना

तीन सिलिंडर मोफत



प्रत्येक पात्र कुटुंबाला दरवर्षी ३ गॅस सिलिंडर मोफत

### मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना



ज्येष्ठ नागरिकांना तीर्थक्षेत्र दर्शनासाठी मनोभावे अर्थसहाय्य..

### मुख्यमंत्री युवा प्रशिक्षित रोजगार योजना



सुशिक्षित बेरोजगार तरुणांना १०००० रुपयांचा स्टायपेंड

SSC / ITI / पदविका पदवीधारक युवा करिता

### महात्मा फुले जनआरोग्य योजनेत 5 लाखाचे आरोग्य संरक्षण



महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत १.५ लाखावरून आता ५ लाखांचे आरोग्य संरक्षण

### मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना



४४ लाख शेतकऱ्यांच्या कृषिपंपांना विनामूल्य वीजपुरवठा

### पंतप्रधान सुर्यघर मोफत वीज योजना.



प्रत्येक घर आणि इमारतीत विनामुल्य सोलर विज



## श्री.विश्वनाथ चंद्रभागा आत्माराम भोईर

आमदार, कल्याण पश्चिम

शिवसेना

जनसंपर्क कार्यालय - ..........................................................

..........................................................................................